## प्रतिवादी क्र.१ तर्फे उलटतपास – श्री. आर. आर. चव्हाण वकील.

**१५.** आम्ही तीन भाऊ असून प्रतिवादी क्र.२ हा आमचा मोठा भाऊ असून मी सर्वात लहान आहे. आमचे वडिल १९७७ साली वारले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या वडिलांच्या निधनानंतर वादी व प्रतिवादी क्र.२ आमच्या कुटुंबाचा कारभार पाहत होते. हे म्हणणे खरे नाही की, वडिलांच्या निधनानंतर आमच्यामध्ये दावा मिळकतींसह इतर मिळकतींचे तोंडी वाटप झाले होते.

**१६.** दावा मिळकतीच्या पुर्वेस आणि दक्षिणेस रस्ता असून उत्तरेस छोटी नदी आहे. मला प्रतिवादी क्र.२ ने दावा मिळकतीतील दक्षिण-पूर्व बाजूच्या २ गुंठे क्षेत्राची प्रतिवादी क्र.१ ला विक्री केल्याची माहिती नाही. मी लहानपणापासून किणे गावात राहत असून माझे शिक्षण तेथेच झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ ने प्रतिवादी क्र.१ ला विक्री केलेल्या क्षेत्राची १९८७ साली फेरफार नोंद झालेली आहे.

**१७.** मी चंदगड येथील साखर कारखान्यात सन १९९९ पासून नोकरी करत आहे. माझे दहावी नापास शिक्षण झालेले आहे. मी कामाच्या ठिकाणी जाऊन-येऊन करतो. मी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा १९८७ नंतर आजपर्यंत पाहिलेला नाही. वादी क्र.१ ने वकिलांना दाव्याबाबत माहिती व कागदपत्रे दिली होती.

**१८.** मी माझे शपथपत्र दाखल करण्यापूर्वी दाव्यात दाखल केलेल्या कागदपत्रांची माहिती घेतली होती. मी शपथपत्र दाखल करण्यापूर्वी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा पाहिला होता. मी त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ चे नाव २ गुंठे क्षेत्रासाठी नमूद असल्याचे पाहिलेले नाही. प्रतिवादी क्र.२ ने केलेल्या विक्रीबाबत वादी क्र.१ अथवा आमच्या आईला कोणतीही माहिती नाही.

**१९.** दावा मिळकतीच्या दक्षिण-पूर्व कोप-यामध्ये १९८७ साली प्रतिवादी क्र.१ च्या संस्थेने ४६ x ३० जागेवरती बांधकाम केलेले आहे. त्यानंतर संस्थेने दक्षिण बाजूला एक खोली बांधली होती. सदर जागेमध्ये प्रतिवादी क्र.१ चे संस्थेमार्फत १९८७ पासून दूधसंकलन केले जात आहे. आम्ही १९८९ साली प्रतिवादी क्र.१ च्या दूधसंकलन केंद्राच्या पश्चिम बाजूला घराचे बांधकाम केलेले आहे. त्यामध्ये मी, वादी क्र.१ व

आमची आई राहत आहोत. प्रतिवादी क्र.२ हा १९८५ पासून त्याच्या परिवारासह वेगळा राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही व प्रतिवादी क्र.२ चा १९८५ पासून वेगवेगळे आर्थिक व्यवहार करत आहोत.

**२०**. मला प्रतिवादी क्र.१ ने ग्रामपंचायत परवानगीने नियमाप्रमाणे दावा मिळकती वरती बांधकाम केल्याची माहिती नाही. या दाव्यापूर्वी आम्ही प्रतिवादी क्र.१ च्या खरेदी आणि बांधकामा बाबत कोणतीही तक्रार केलेली नाही. प्रतिवादी क्र.१ च्या बांधकामाच्या उत्तरेला १५ x १२ खुली जागा शिल्लक आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ अडगळीचे साहित्य ठेवते.

**२१**. प्रतिवादी क्र.१ च्या बांधकामाच्या पुर्वेला एम.एस.ई.बी. चे खांब असून त्यावरती डी.पी. बसवलेली आहे. प्रतिवादी क्र.१ ला खांब व डी.पी. ची अडचण येत असल्यामुळे त्याने केलेल्या विनंती वरुन एम.एस.ई.बी. ने काढून घेतल्याची मला माहिती नाही. सन २०११ पासून प्रतिवादी क्र.१ च्या बांधकामाच्या पुर्वेला खांब व डी.पी. नाही. दावा मिळकतीच्या पुर्व व दक्षिण बाजूला सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ता रुंदीकरण करुन गटारीचे बांधकाम केलेले आहे. त्याबाबत संबंधित विभागाने सरकारी जमिनीचे मोजमाप करुन गटारींचे बांधकाम केलेले आहे.

**२२**. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला आमचे क्षेत्र वाढवण्यासाठी प्रतिवादी क्र.१ ची उत्तरेकडील खुली जागा हवी आहे. आम्ही प्रतिवादी क्र.१ ला शौचालय व स्वच्छतागृह बांधण्यासाठी विक्री केलेल्या २ गुंठे जागेच्या उत्तर-पूर्व बाजूला जागा दिली आहे. त्यावरती प्रतिवादी क्र.१ ने बांधकाम केलेले आहे.

**प्रश्न** - तुम्ही प्रतिवादी क्र.१ ला शौचालय व स्नानगृह बांधण्याकरीता दिलेल्या जागेच्या बदल्यात तुम्हाला त्याने त्यांची उत्तरेकडील १६ x १२ खुली जागा दिलेली आहे ?

**उत्तर** - आम्ही ती जागा घेतलेली नाही.

**२३**. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी आम्ही त्या खुल्या जागेचा वापर करत आहोत. मला प्रतिवादी क्र.१ ने आम्ही दिलेल्या जागेवरती सन २००२ मध्ये शौचालय

व स्नानगृहाचे बांधकाम केल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही प्रतिवादी क्र.१ सोबत केलेल्या जागेच्या अदला-बदली बाबत दि.०५.०१.२००१ रोजी करारनामा केलेला असून त्यावरती माझी स्वाक्षरी आहे. मला त्या करारा प्रमाणे प्रतिवादी क्र.१ ने १५,०००/- रुपये आम्हाला द्यायचे ठरल्याची माहिती नाही. मला त्याबाबतची दि.२७.०२.२००२ रोजी धनादेशाने ५,०००/- आणि दि. ०७.०५.२००२ रोजी रोखीने १०,०००/- प्रतिवादी क्र.२ ला मिळाल्याची माहिती नाही. मला सदर रक्कम स्विकारल्या बाबत प्रतिवादी क्र.२ ने पावती लिहून दिल्याची माहिती नाही.

**२४**. मला सदर दावा किती क्षेत्राबाबत दाखल केला आहे ते आठवत नाही. प्रतिवादी क्र.१ च्या २ गुंठे जागेच्या पुर्वेला गटार व रस्ता, पश्चिमेला आमचे घर, उत्तरेला आमची शेती आणि दक्षिणेला गटार व रस्ता आहे. मला प्रतिवादी क्र.१ ने त्यांची जागा के.डी.सी. बँकेला भाडयाने दिल्याची माहिती नाही.

**२५**. मला दावा मिळकतीची न्यायालयाच्या आदेशाने मोजणी झाल्याची माहिती नाही. आम्हाला मोजणीच्या नोटीसा मिळालेल्या होत्या. मी तो मोजणी नकाशा पाहिलेला नसून त्याबाबत तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने दक्षिण बाजूला बांधलेली खोली अतिक्रमित जागेमध्ये असल्याबाबत त्याला सार्वजनिक बांधकाम विभागाने नोटीस दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या घराची दक्षिणे कडील भिंत अतिक्रमित क्षेत्रात येत असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने आम्हाला नोटीस दिली होती.

२६. **प्रश्न** - प्रतिवादी क्र.१ ने त्याची खोली अतिक्रमित क्षेत्रात आल्यामुळे पाडली होती ?

**उत्तर** - प्रतिवादी क्र.१ ने आम्ही दावा दाखल केल्यानंतर बांधकाम केलेली खोली पाडलेली आहे.

**२७**. हे म्हणणे खरे नाही की, सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेले गटार आमच्या घराच्या भिंतीमुळे बंद झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.४० बाबत

ग्रामपंचायतीने मागवलेली मोजणी आम्ही अर्ज देऊन बंद केली होती. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.४० मध्ये सार्वजनिक विहिर आहे. ७/१२ उता-यावरती सार्वजनिक विहिरीची खोटी नोंद झालेली आहे.

**२८**. प्रतिवादी क्र.२ किणे गावात राहतो. हे म्हणणे खरे नाही की, आमचे व त्याचे आज रोजी चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.४० मधील दक्षिणेकडील १/३ हिस्सा प्रतिवादी क्र.२ ला वाटणीमध्ये देण्यात आलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ ने १९८९ साली त्या जागेमध्ये स्वतःसाठी घराचे बांधकाम केले होते.

**प्रश्न** - तुमच्या घराचे *आडे* प्रतिवादी क्र.१ च्या पश्चिमेच्या भिंतीवरती ठेवलेले आहे ?

**उत्तर** - आमच्या व प्रतिवादी क्र.१ मध्ये सामाईक भिंत आहे.

**२९**. आमचा व प्रतिवादी क्र.१ चा पश्चिमेकडील भिंतीवर *आडे* ठेवण्याबाबत करारनामा झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही प्रतिवादी क्र.१ च्या संमतीने आमच्या घराचे *आडे* ठेवलेले आहे. प्रतिवादी क्र.१ ने बांधलेल्या शौचालय व स्नानगृहाशी आणि २ गुंठे जागेशी आमचा संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ च्या मिळकतीला ग्रामपंचायत मि.क्र.३८३/१ देण्यात आलेला असून उर्वरीत पडील जागेला मि.क्र.३८३/२ दिलेला आहे.

**३०**. मी कधीही ग्रामपंचायत सदस्य नव्हतो. आम्ही प्रतिवादी क्र.१ च्या मिळकतींना दिलेल्या क्रमांकांना आक्षेप घेतलेला नाही. प्रतिवादी क्र.१ सहकारी संस्था असून तिची प्रत्येक ५ वर्षांनी निवडणूक होते. मसणू सुतार तिचे संस्थापक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी मसणू सुतार यांच्याकडे सदर संस्थेमध्ये संचालक म्हणून नियुक्ती करण्याची मागणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मसणू सुतार यांनी आम्हाला तुमची जागा असल्यामुळे संचालक करतो असे सांगितले होते.

**३१**. आमच्या गावामध्ये मसणू सुतार व विष्णू केसरकर यांचे दोन राजकीय गट आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी व वादी सध्या विष्णू केसरकर यांच्या राजकीय

गटाचे काम करतो. मला मसणू सुतार व विष्णू केसरकर एकमेकांच्या संस्थेमध्ये सत्ताबदल करण्याचे प्रयत्न करत असल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मसणू सुतार याने मला संचाकल करुन घेतलेले नसल्यामुळे मी केसरकर गटाचे काम करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, विष्णू केसरकर गटाच्या सांगण्यावरुन आम्ही खोटा दावा दाखल केलेला असून आज खोटी साक्ष देत आहे. प्रतिवादी क्र.१ ला आम्ही दावा दाखल करण्यापूर्वी नोटीस दिलेली नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्विकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक - ०९.१२.२०२४. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.